# अखिल भारतीय मराठी नाटय परिषद

स्थापनाः २८ ऑगस्ट १९०५

नोंदणी क्र.: ई - २६३५, अन्वये बी.पी.टी. अॅक्ट १९५०

# ११५ वा वार्षिक अहवाल व जमाखर्च

(१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४)

आणि

# अंदाजपत्रक

(२०२४-२५)

## -: कार्यालय :-

अखिल भारतीय मराठी नाटय परिषद
यशवंतराव चव्हाण नाटयसंकुल, तळमजला,
मनमाला टँक रोड, मांटुगा-माहिम, मुंबई ४०००१६.
दूरध्वनी क्र. २४३००५९४ / २४३७७६४९

जा.क्र. २५२६/२०२४-२५ दिनांक: ३० नोव्हेंबर २०२४

**(फक्त सभासदांसाठी)**

अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेची इ.सन २०२३-२४ (१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४) ची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता परिषदेचे अध्यक्ष श्री. प्रशांत दामले यांचे अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण नाटय संकुल, मनमाला टँक रोड, माटुंगा-माहिम, मुंबई ४०००१६ येथे होणार आहे. या सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

**- सभेपुढील विषय -**

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून सुधारणासह संमत करणे.
२. इतिवृत्तातून निर्माण होणाऱ्या मुद्यांवर विचार करणे.
३. परिषदेचा १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीचा वार्षिक अहवाल सादर करणे व संमत करणे.
४. परिषदेचे १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीचे हिशेब तपासनीसांनी तपासलेले हिशेब सादर करणे व संमत करणे.
५. अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
६. इ.सन २०२४-२५ या वर्षाचे अंदाजपत्रक सादर करणे व संमत करणे.
७. इ.सन २०२४-२५ या वर्षाकरिता हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८. नाटय संकुल प्रगतीचा आढावा घेणे व परिषदेच्या भावी कामकाजाविषयी चर्चा व निर्णय.
९. १०० व्या नाटय संमेलनाबाबतची माहिती.
१०. सभासदांकडून रीतसर आलेल्या ठरावांवर व सूचनांवर चर्चा घडवून बहुमताने निर्णय घेणे.
११. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयांची चर्चा करणे व ठराव संमत करून बहुमताने निर्णय घेणे.

आपला,

(अजित भुरे)
प्रमुख कार्यवाह

**विशेष सूचना:**

१. गणसंख्येअभावी ही सभा तहकूब झाल्यास पुन्हा ती सभा त्याच जागी अर्ध्या तासानंतर वरील कामकाजासाठी भरेल. या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२. ज्या सभासदांना अहवाल अगर जमाखर्चासंबंधी अधिक माहिती विचारावयाची असेल त्यांना ती माहिती दि. ४ डिसेंबर २०२४ ते दिनांक ११ डिसेंबर २०२४ पर्यंत प्रतिदिनी दुपारी २ ते सायं. ५ या वेळेत परिषद कार्यालय, माटुंगा-माहिम, मुंबई ४०००१६ येथे पुरविण्यात येईल.
३. वार्षिक सभेत ठराव/सूचना करावयाच्या असल्यास सूचक व अनुमोदक यांच्या सहीने ठरावासह त्या अर्थाची लेखी सूचना दि. १२ डिसेंबर २०२४ पर्यंत परिषदेच्या कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे.

४. वार्षिक अहवाल शाखेच्या सभासदांसाठी शाखेच्या कार्यालयात, तसेच मुंबईतील व सर्व सभासदांसाठी मध्यवर्ती कार्यालयात दिनांक २ डिसेंबर २०२४ पासून अवलोकनार्थ उपलब्ध होईल व मागणी केल्यास उपलब्ध करून दिला जाईल. तसेच अहवाल व हिशेबपत्रक नाटय परिषदेच्या www.natyaparishad.org या वेबसाईटवर सभासदांसाठी उपलब्ध करण्यात आले आहे.

## नियामक मंडळ २०२३-२८

| | |
|---|---|
| अध्यक्ष | - श्री. प्रशांत दामले |
| उपाध्यक्ष (प्रशासन) | - श्री. नरेश गडेकर |
| उपाध्यक्ष (उपक्रम ) | - श्री. भाऊसाहेब भोईर |
| प्रमुख कार्यवाह | - श्री. अजित भुरे |
| कोषाध्यक्ष | - श्री. सतीश लोटके |
| सहकार्यवाह | - श्री. समीर इंदुलकर, श्री. सुनिल ढगे, श्री. दिलीप कोरके |

## कार्यकारी समिती सदस्य

| | | |
|---|---|---|
| श्री. विजय चौगुले | श्रीमती सविता मालपेकर | श्री. सुशांत शेलार |
| श्री. संजय देसाई | श्रीमती दीपा क्षीरसागर | श्री. शंकर (दीपक) रेगे |
| श्री. गिरीश महाजन | श्री. विजयकुमार साळुंके | श्री. संजय रहाटे |
| श्री. विशाल शिंगाडे | श्री. संदीप पाटील | |

## नियामक मंडळ सदस्य

| | | |
|---|---|---|
| श्रीमती वैजयंती आपटे | श्री. विजय केंकरे | श्री. विजय गोखले |
| श्री. सयाजी शिंदे | सौ. सुकन्या कुलकर्णी – मोने | श्री. संदीप जंगम |
| श्री. शिवाजी शिंदे | श्री. शामनाथ पुंडे | श्री. उदय राजेशिर्के |
| श्री. आनंद कुलकर्णी | श्री. राजन मुठाणे | श्री. चंद्रकांत धामणीकर |
| श्री. मुकुंद पटवर्धन | श्री. राजेश कुंभारदरे | श्री. विश्वनाथ आवड |
| सौ. तेजस्विनी कदम | श्री. समद फुलमामडी | श्री. अजय दासरी |
| श्री. मेघराज राजेभोसले | श्री. सुरेश धोत्रे | श्री. सुहास जोशी |
| श्री. समीर हंपी | श्री. सत्यजीत धांडेकर | श्री. राजेंद्र जाधव |
| श्री. रविंद्र कदम | श्री. क्षितीज झावरे | श्री. संजयकुमार दळवी |
| श्री. प्रफुल्ल फरकसे | श्री. प्रशांत देशपांडे | श्री. उज्वल देशमुख |
| श्री. नंदकिशोर कव्हळकर | श्री. संजय पाटील – देवळाणकर | श्री. चंद्रशेखर पाटील |
| श्री. शैलेश गोजमगुंडे | सौ. गीताबाली उनवणे | श्रीम. गीतांजली ठाकरे |
| श्री. जगन्नाथ (नाथा) चितळे | | |

## (घटक संस्था प्रतिनिधी- राखीव)

| | | |
|---|---|---|
| सौ. निलम शिर्के- सामंत | श्री. विजय सूर्यवंशी | श्री. रत्नकांत जगताप |

## सल्लागार

मा.श्री. रविंद्र आवटी

## कार्यकारी समिती २०२३-२४

| | |
|---|---|
| अध्यक्ष | - श्री. प्रशांत दामले |
| उपाध्यक्ष (प्रशासन) | - श्री. नरेश गडेकर |
| प्रमुख कार्यवाह | - श्री. अजित भुरे |
| कोषाध्यक्ष | - श्री. सतीश लोटके |
| सहकार्यवाह | - श्री. समीर इंदुलकर, श्री. सुनिल ढगे, श्री. दिलीप कोरके |

## सदस्य

| | | |
|---|---|---|
| श्री. विजय चौगुले | श्रीमती सविता मालपेकर | श्री. सुशांत शेलार |
| श्री. संजय देसाई | श्रीमती दीपा क्षीरसागर | श्री. शंकर (दीपक) रेगे |
| श्री. गिरीश महाजन | श्री. विजयकुमार साळुंके | श्री. संजय रहाटे |
| श्री. विशाल शिंगाडे | श्री. संदीप पाटील | |

## अखिल भारतीय मराठी नाटय परिषद विश्वस्त

| | |
|---|---|
| मा.खा.श्री. शरद पवार (तहहयात विश्वस्त) | डॉ. रवी बापट (तहहयात विश्वस्त) |
| मा.श्री. शशी प्रभु (तहहयात विश्वस्त) | मा.श्री. उदय सामंत (विश्वस्त) |
| मा.श्री. मोहन जोशी (विश्वस्त) | मा.श्री. गिरीश गांधी (विश्वस्त) |
| मा.श्री. अशोक हांडे (विश्वस्त) | |

**बँकर्स -** बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ इंडिया, युनियन बँक, सारस्वत को.ऑप. बँक आणि मुंबई बँक,

| | |
|---|---|
| मानद वास्तूविशारद | :- श्री. शशी प्रभु अॅण्ड असोशिएट |
| सनदी लेखापाल | :- श्री. रवी सावंत अॅण्ड कंपनी |
| कायदेशीर सल्लागार | :- अॅड. घनश्याम हुले |

# अखिल भारतीय मराठी नाटय परिषद, मुंबई
# वार्षिक अहवाल २०२३-२०२४
# (१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४)

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा इ.सन २०२३-२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सादर करण्यास नियामक मंडळास अतिशय आनंद होत आहे.

## नियामक मंडळ सभा

नियामक मंडळाच्या एकूण ३ सभा झाल्या. या सभांना मुंबई व मुंबईबाहेरील बहुसंख्य सभासद उपस्थित होते. ( उपस्थिती पान क्र. ७) सभेत महत्वाचे निर्णय घेण्यात आले.

## कार्यकारी समिती सभा

कार्यकारी समितीचे पदाधिकारी व सदस्य कार्यपरत्वे परिषदेच्या कार्यालयात हजर राहून निरपेक्ष भावनेने परिषदेचा कार्यभार सांभाळीत आहेत. त्यामुळे नाट्यसृष्टीच्या सर्व घटकांचा परिषदेच्या कार्यालयाशी सातत्याने संपर्क साधला जात आहे. कार्यकारी समितीच्या एकूण ११ सभा झाल्या. (उपस्थिती पान क्र. ६) १४ जूनचा भव्य कलावंत मेळावा व पारितोषिक वितरण समारंभ, शाखांतर्गत एकांकिका स्पर्धा व १०० वे नाटय संमेलन हे परिषदेचे महत्वपूर्ण उपक्रम होत.

## वार्षिक सर्वसाधारण सभा

परिषदेची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २१ नोव्हेंबर २०२३ रोजी दुपारी ३.०० वाजता परिषदेचे अध्यक्ष श्री. प्रशांत दामले यांच्या अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल, तळमजला, मनमाला टक रोड, माटुंगा-माहिम, मुंबई ४०००१६ येथे संपन्न झाली.

## आजीव सभासद

परिषदेची एकूण सभासद संख्या दि. ३१.०३.२०२४ अखेर २९१९६ आहे.

### आर्थिक मदत

गरजू व वृध्द नाट्याकर्मींना पेन्शन योजनेतून 'अखिल भारतीय मराठी नाटय परिषद' आर्थिक सहाय्य करीत आहे.

**कार्यकारी समिती सभांची उपस्थिती (एकूण सभा ११)**
**(१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४)**

| क्र. | नाव | उपस्थिती |
|---|---|---|
| १. | श्री. प्रशांत दामले - अध्यक्ष | ११ |
| २. | श्री. नरेश गडेकर - उपाध्यक्ष (प्रशासन) | ०७ |
| ३. | श्री. भाऊसाहेब भोईर उपाध्यक्ष (उपक्रम) | १० |
| ४. | श्री. अजित भुरे- प्रमुख कार्यवाह | ११ |
| ५. | श्री. सतीश लोटके - (कोषाध्यक्ष) | ११ |
| ६. | श्री. समीर इंदुलकर - (सहकार्यवाह) | ०५ |
| ७. | श्री. दिलीप कोरके (सहकार्यवाह) | १० |
| ८. | श्री. सुनील ढगे | ०८ |
| ९. | श्री. विजय चौगुले | ०८ |
| १०. | सौ. सविता मालपेकर | ०८ |
| ११. | श्री. सुशांत शेलार | ०६ |
| १२. | श्री. संजय देसाई | ११ |
| १३. | सौ. दीपा क्षीरसागर | ०७ |
| १४. | श्री. शंकर (दीपक) रेगे | ०९ |
| १५. | श्री. गिरीश महाजन | १० |
| १६. | श्री. विजयकुमार साळुंके | १० |
| १७. | श्री. संजय रहाटे | ०७ |
| १८. | श्री. विशाल शिंगाडे | ०६ |
| १९. | श्री. संदीप पाटील | ०९ |

**नियामक मंडळ सभांची उपस्थिती (एकूण सभा ०३)**
**(१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४)**

| क्र. | नाव | कालावधी | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १. | श्री. प्रशांत दामले | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| २. | श्री. नरेश गडेकर | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| ३. | श्री. भाऊसाहेब भोईर | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| ४. | श्री. अजित भुरे | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| ५. | श्री. सतीश लोटके | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| ६. | श्री. समीर इंदुलकर | (१६ मे २०२३ पासून) | ०० |
| ७. | श्री. दिलीप कोरके | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| ८. | श्री. सुनील ढगे | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| ९. | श्री. विजय चौगुले | (१६ मे २०२३ पासून) | ०१ |
| १०. | सौ. सविता मालपेकर | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| ११. | श्री. सुशांत शेलार | (१६ मे २०२३ पासून) | ०१ |
| १२. | श्री. संजय देसाई | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| १३. | सौ. दीपा क्षीरसागर | (१६ मे २०२३ पासून) | ०२ |
| १४. | श्री. शंकर (दीपक) रेगे | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| १५. | श्री. गिरीश महाजन | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| १६. | श्री. विजयकुमार साळुंके | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| १७. | श्री. संजय रहाटे | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| १८. | श्री. विशाल शिंगाडे | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| १९. | श्री. संदीप पाटील | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| २०. | श्रीमती वैजयंती आपटे | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| २१. | श्री. विजय केंकरे | (१६ मे २०२३ पासून) | ०१ |
| २२. | श्री. विजय गोखले | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| २३. | श्री. सयाजी शिंदे | (१६ मे २०२३ पासून) | ०० |
| २४. | श्री. संदीप जंगम | (१६ मे २०२३ पासून) | ०२ |
| २५. | श्री. शिवाजी शिंदे | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| २६. | श्री. शामनाथ पुंडे | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| २७. | श्री. उदय राजेशिर्के | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| २८. | श्री. राजन मुठाणे | (१६ मे २०२३ पासून) | ०२ |
| २९. | श्री. आनंद कुलकर्णी | (१६ मे २०२३ पासून) | ०२ |
| ३०. | श्री. चंद्रकांत धामणीकर | (१६ मे २०२३ पासून) | ०१ |
| ३१. | श्री. मुकुंद पटवर्धन | (१६ मे २०२३ पासून) | ०१ |
| ३२. | श्री. राजेश कुंभारदरे | (१६ मे २०२३ पासून) | ०० |
| ३३. | श्री. विश्वनाथ आवड | (१६ मे २०२३ पासून) | ०२ |
| ३४. | सौ. तेजस्विनी कदम | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| ३५. | श्री. समद फुलमामडी | (१६ मे २०२३ पासून) | ०२ |
| ३६. | श्री. सुरेश धोत्रे | (१६ मे २०२३ पासून) | ०२ |
| ३७. | श्री. सुहास जोशी | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८. | श्री. समीर हंपी | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| ३९. | श्री. सत्यजित धांडेकर | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| ४०. | श्री. मेघराज राजेभोसले | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| ४१. | श्री. राजेंद्र जाधव | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| ४२. | श्री. रविंद्र कदम | (१६ मे २०२३ पासून) | ०१ |
| ४३. | श्री. क्षितीज झावरे | (१६ मे २०२३ पासून) | ०२ |
| ४४. | श्री. संजयकुमार दळवी | (१६ मे २०२३ पासून) | ०१ |
| ४५. | श्री. प्रफुल्ल फरकासे | (१६ मे २०२३ पासून) | ०० |
| ४६. | श्री. प्रशांत देशपांडे | (१६ मे २०२३ पासून) | ०० |
| ४७. | श्री. नंदकिशोर कव्हळकर | (१६ मे २०२३ पासून) | ०१ |
| ४८. | श्री. उज्वल देशमुख | (१६ मे २०२३ पासून) | ०२ |
| ४९. | श्री. संजय पाटील-देवळाणकर | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| ५०. | श्री. चंद्रशेखर पाटील | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| ५१. | श्रीमती सुकन्या कुलकर्णी | (१६ मे २०२३ पासून) | ०० |
| ५२. | श्री. अजय दासरी | (१६ मे २०२३ पासून) | ०१ |
| ५३. | श्री. शैलेश गोजमगुंडे | (१६ मे २०२३ पासून) | ०१ |
| ५४. | श्रीमती गीताबाली उनवणे | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| ५५. | श्रीमती गीतांजली ठाकरे | (१६ मे २०२३ पासून) | ०३ |
| ५६. | श्री. जगन्नाथ चितळे | (१६ मे २०२३ पासून) | ०२ |
| ५७. | श्री. नवनाथ (प्रसाद) कांबळी | (३१ मार्च २०२३ पर्यंत) | ०० |
| ५८. | श्री. अविनाश नारकर | (३१ मार्च २०२३ पर्यंत) | ०० |
| ५९. | श्रीमती ऐश्वर्या नारकर | (३१ मार्च २०२३ पर्यंत) | ०० |
| ६० | श्रीमती विणा लोकूर | (राजीनामा) | ०० |
| ६१. | श्रीमती निलम शिर्के-सामंत | (२३ मे २०२३ पासून) | ०१ |
| ६२. | श्री. विजय सूर्यवंशी | (२३ मे २०२३ पासून) | ०२ |
| ६३. | श्री. रत्नकांत जगताप | ( १९ ऑक्टोबर २०२३ पासून) | ०१ |

**घटक संघटना**

अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेशी संलग्न असलेल्या रंगभूमीशी संबंधितांच्या खालीलप्रमाणे संघटना कार्यरत आहेत.

१. मराठी नाटय व्यावसायिक निर्माता संघ २. रंगमंच कामगार संघ ३. मराठी नाटय कलाकार संघ
४. नाटय व्यवस्थापक संघ ५. बालरंगभूमी परिषद.

**शोक समाचार**

अहवालसाली रंगभूमीशी संबंधित अशा ज्या व्यक्तींचे दुःखद निधन झाले, त्या सर्व व्यक्तींच्या कुटुंबियांच्या दुःखात अखिल भारतीय मराठी नाटय परिषद सहभागी आहे.

**अभिनंदन**

अहवाल साली रंगभूमीशी संबंधीत अशा ज्या व्यक्ती अगर संस्था विविध पुरस्कारांनी सन्मानित झाल्या, त्या सर्वांचे अखिल भारतीय मराठी नाटय परिषद मनःपूर्वक अभिनंदन करीत आहे.

**नाट्यविषयक उपक्रम**

सन २०२३-२४ या वर्षात नाटयविषयक उपक्रम राबविण्यात आले. या अहवाल सालात अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेची सन २०२३-२०२८ साठी पंचवार्षिक निवडणुकीचे कामकाज सुरु झाले. सन २०२३-२०२८ या कालावधीसाठी नियामक मंडळ आणि कार्यकारी समितीच्या निवडणुकीची प्रक्रिया संपन्न झाली. दिनांक १६ एप्रिल २०२३ रोजी पंचवार्षिक निवडणुकीचे कामकाज पूर्ण होऊन नवनिर्वाचित नियामक मंडळ अस्तित्वात आले. त्यानंतर दिनांक १६ मे २०२३ रोजी कार्यकारी समितीची निवडणूक संपन्न होऊन नवनिर्वाचित कार्यकारी समिती अस्तित्वात आली. तसेच कार्यकारी समिती, पदाधिकारी यांनी आपला पदभार स्वीकारला आहे. नाट्य परिषदेचे कार्य जोमाने व सुनियोजित, सुव्यवस्थित करण्यासाठी नियामक मंडळ प्रयत्नशील आहे. नाट्य परिषदेच्या यशस्वी वाटचालीसाठी परिषदेचे तहहयात विश्वस्त मा.खा.श्री. शरद पवार, मा.श्री. शशी प्रभू, मा.डॉ. रवी बापट व विश्वस्त मा.ना.श्री. उदय सामंत, श्री. मोहन जोशी. श्री. अशोक हांडे, श्री. गिरीश गांधी यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभत आहे. नियामक मंडळ व कार्यकारी समिती यांनी केलेल्या कामकाजाचा आढावा पुढीलप्रमाणे.

नवनिर्वाचित कार्यकारी समितीने व नियामक मंडळाने २ वर्षांपासून बंद असलेल्या यशवंतराव चव्हाण नाटय संकुलाच्या दुरुस्तीचे काम हाती घेऊन दिनांक १४ जून २०२३ रोजी नाट्यगृह रसिकांसाठी पूर्ववत सुरु केले.

नाट्यगृह सुधार समिती स्थापन करून संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व नाट्यगृह एका छताखाली आणण्यासाठी परिषदेच्या वतीने शासन दरबारी प्रयत्न करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या अर्थसंकल्पात नाट्यगृह सुस्थितीत आणण्यासाठी जो निधी दिला जातो तो योग्य ठिकाणी आणि योग्य पद्धतीने वापरला गेला तर सर्व नाट्यगृह सुस्थितीत येतील. ही नाट्यगृहे कायमस्वरूपी सुस्थितीत ठेवण्यासाठी एक वेगळा निधी उपलब्ध करून तो निधी बँकेत 'कायम ठेव' स्वरूपात ठेवावा आणि त्याच्या व्याजावर ही सर्व सुधारित नाट्यगृहे सुस्थितीत रहावीत याकरिता जिल्हानिहाय समिती स्थापन करण्यात यावी व यात नाट्य परिषदेचा स्थानिक प्रतिनिधी व प्रत्यक्ष नाटकाशी संबंधित असलेल्या स्थानिक व्यक्ती ह्या समितीत असाव्यात. समितीला अधिकृत दर्जा द्यावा ज्यायोगे वेगवेगळ्या जिल्ह्यातील, तालुक्यातील अधिकाऱ्यांशी बोलणे, संपर्क करणे सोपे जाईल याबाबत शासन दरबारी पाठपुरावा चालू आहे.

**गो.ब. देवल स्मृतिदिन, वार्षिक पुरस्कार वितरण सोहळा व कलावंत मेळावा**

प्रतिवर्षी नाटककार गो.ब.देवल यांच्या स्मृतीप्रित्यर्थ १४ जून रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी ज्येष्ठ अभिनेते, नाट्य परिषदेचे माजी अध्यक्ष तथा विश्वस्त मा.श्री. मोहन जोशी व ज्येष्ठ अभिनेत्री मा.श्रीमती वंदना गुप्ते यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या सोहळ्याला महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री. एकनाथ शिंदे, उद्योग मंत्री मा.ना. उदय सामंत तसेच रंगभूमीवरील बहुसंख्य रंगकर्मी उपस्थित होते.

**आर्थिक निधी**

अध्यक्ष श्री. प्रशांत दामले आणि श्रीमती कविता लाड यांनी नाट्य परिषदेला "कोण होणार करोडपती" या कार्यक्रमाच्या माध्यमातून जिंकलेली बारा लाख पन्नास हजार रक्कम नाट्य परिषदेस देणगी स्वरुपात दिली आहे. त्याबद्दल त्यांचे आभार.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेस राष्ट्रवादी वेल्फेअर ट्रस्टच्या वतीने रु. ५०,००,०००/- (रुपये पन्नास लाख फक्त) इतकी आर्थिक मदत नाट्य संकुल दुरुस्तीसाठी केलेली आहे. त्याबद्दल विश्वस्त मा. खा. शरद पवार साहेब यांचे आभार.

**शाखांतर्गत एकांकिका स्पर्धा**

मध्यवर्तीच्या वतीने घेण्यात येणाऱ्या शाखांतर्गत एकांकिका स्पर्धा गेल्या चार वर्षापासून बंद होत्या. त्या एकांकिका स्पर्धा पुन्हा सुरु करण्यात आल्या. एकूण २५ शाखांनी यात सहभाग नोंदविला. महाराष्ट्रातील अमरावती, कोल्हापूर, पिंपरी-

चिंचवड, सोलापूर व मुंबई या ५ केंद्रांवर प्राथमिक फेरी संपन्न झाली. अंतिम फेरी मुंबई येथे दि.१९ ऑक्टोबर २०२३ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्य संकुल, मनमाला टँक रोड, माटुंगा, मुंबई ४०००१६ येथे संपन्न झाली. यात नाशिक शाखेची 'अ डील' एकांकिका सर्वोत्कृष्ट, अमरावती शाखेची 'मधुमोह' एकांकिका उत्कृष्ट, इचलकरंजी शाखेची 'हा वास कुठून येतो' एकांकिका उत्तम व अहमदनगर शाखेच्या 'जाहला सोहळा अनुपम' या एकांकिकेस उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे परीक्षण अमरावती केंद्रावर ईश्वर जगताप, शाम अधटराव, कोल्हापूर केंद्रावर प्रविण शांताराम, राहुल वैद्य, पिंपरी-चिंचवड केंद्रावर संजय डहाळे, राजीव जोशी, मुंबई केंद्रावर रुपाली मोरे, अनंत जोशी, सोलापूर केंद्रावर सुरेंद्र वानखेडे, सुहास जोशी व अंतिम फेरीचे परीक्षण अनिल बांदिवडेकर, देवेंद्र पेम, प्रदीप मुळ्ये, शीतल करदेकर व शीतल तळपदे यांनी केले. पारितोषिक वितरणास परिषदेचे तहहयात विश्वस्त श्री. शशी प्रभू, विश्वस्त श्री. अशोक हांडे, परिषदेचे अध्यक्ष श्री. प्रशांत दामले, उपाध्यक्ष (प्रशासन) श्री. नरेश गडेकर, कोषाध्यक्ष श्री. सतीश लोटके, सहकार्यवाह श्री. सुनिल ढगे, श्री. दिलीप कोरके, कार्यकारी समिती सदस्या श्रीमती सविता मालपेकर, ज्येष्ठ अभिनेते व नियामक मंडळ सदस्य श्री. विजय गोखले, नियामक मंडळ सदस्या श्रीमती निलम शिर्के – सामंत, आदि प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कोषाध्यक्ष श्री. सतीश लोटके यांनी केले, तर स्पर्धा प्रमुख म्हणून श्री. शिवाजी शिंदे यांनी काम पाहिले.

**१०० वे नाट्य संमेलनानिमित्त "नाट्यकलेचा जागर महोत्सव"**

रंगभूमीची मध्यवर्ती संघटना अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, मुंबई आयोजित, नाट्य संस्कृती लाभलेल्या महाराष्ट्र राज्यात मानाचे शतकमहोत्सवी अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने मोठ्या स्वरूपात आणि धूमधडाक्यात साजरे करण्याचे योजिले आहे. या संमेलनाचा महत्वाचा भाग महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील कलावंत, नाट्यकर्मींसाठी 'नाट्यकलेचा जागर' हा स्पर्धात्मक महोत्सव दिनांक १५ जानेवारी २०२४ पासून सुरू करण्यात आला. या महोत्सवात एकांकिका स्पर्धा, बालनाट्य स्पर्धा, एकपात्री स्पर्धा, नाट्यवाचन स्पर्धा, नाट्यछटा स्पर्धा, नाट्यसंगीत पद गायन स्पर्धा यांचा समावेश करण्यात आला. या स्पर्धांमध्ये महाराष्ट्रातील १२५०० कलावंतांनी भाग घेतला .

'नाट्यकलेचा जागर' महोत्सव महाराष्ट्रातील रत्नागिरी, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, अहमदनगर, बीड, नांदेड, लातूर, औरंगाबाद, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, वाशिम, ठाणे, नवीमुंबई, मुंबई अशा विविध २२ केंद्रांवर संपन्न झाला. या स्पर्धा महोत्सवाची प्राथमिक फेरी दिनांक २८ जानेवारी २०२४ ते दिनांक १० फेब्रुवारी २०२४ या कालावधीत १६ केंद्रावर संपन्न झाली. त्यातून निवडलेल्या स्पर्धक / संस्थांची उपांत्य फेरी दिनांक २ मार्च २०२४ ते दिनांक १८ मार्च २०२४ या कालावधीत मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, अहमदनगर येथे एकांकिका (२६ संस्था), बालनाट्य (२६ संस्था) व एकपात्री (६३ स्पर्धक) पार पडली.

अंतिम फेरीत निवड झालेल्या कलावंतांसाठी ४ दिवसीय नाट्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सदर स्पर्धेतील निवडक ९ एकांकिकेसाठी मार्गदर्शक म्हणून विजय केंकरे , चंद्रकांत कुलकर्णी, कुमार सोहोनी, मंगेश कदम, संतोष पवार, नीरज शिरवईकर ,राजेश देशपांडे, अद्वैत दादरकर, विजू माने यांनी मार्गदर्शन केले. हे शिबिर नाट्यक्षेत्रातील दिग्गज दिग्दर्शक, अभिनेते, अभिनेत्री यांनी घेतले असून यामुळे अंतिम फेरीतील सादरीकरणाचा दर्जा सर्वोत्तम ठरला आहे.

या स्पर्धा महोत्सवाच्या अंतिम फेरीत सहभागी कलावंत व संस्था नाट्यछटा (४६) एकपात्री (२९), नाट्य अभिवाचन (२१), नाट्य संगीत पद गायन यशवंत नाट्य मंदिर, मनमाला टँक रोड, मुंबई ४०००१६ येथे संपन्न झाली. रसिक प्रेक्षकांसाठी प्रवेश विनामूल्य ठेवण्यात आले होते.

**स्पर्धेची रोख पारितोषिके**

**एकांकिका स्पर्धा –**

सर्वोत्कृष्ट रू. २,००,०००/- (खास स्पर्धेसाठी लिखाण केलेल्या एकांकिकेस) अथवा सर्वोत्कृष्ट १,००,०००/-, उत्कृष्ट रू. ७५,०००/-, उत्तम रू. ५०,०००/-, दोन उत्तेजनार्थ पारितोषिके रू. २५,०००/-

**बालनाट्य स्पर्धा –**

सर्वोत्कृष्ट रू. ७५,०००/-, उत्कृष्ट रू. ५०,०००/-, उत्तम रू. २५,०००/-, तर तीन उत्तेजनार्थ रू. १०,०००/-

**नाट्यवाचन स्पर्धा –**

सर्वोत्कृष्ट रू. २५,०००/-, उत्कृष्ट रू. १५,०००/-, उत्तम रू. १०,०००/-, दोन उत्तेजनार्थ रू. ५,०००/-

**नाट्यसंगीत पद गायन स्पर्धा**

सर्वोत्कृष्ट रू. २५,०००/-, उत्कृष्ट रू. १५,०००/-, उत्तम रू. १०,०००/-, दोन उत्तेजनार्थ रू. ५,०००/-

**एकपात्री / नाट्यछटा स्पर्धा**

सर्वोत्कृष्ट रू. १५,०००/-, उत्कृष्ट रू. १०,०००/-, उत्तम रू. ५,०००/-, दोन उत्तेजनार्थ रू. २,५००/-

लेखन/दिग्दर्शन/नेपथ्य/प्रकाश योजना/पार्श्वसंगीत/स्त्री अभिनय/पुरूष अभिनय वैयक्तिक रोख पारितोषिके (एकांकिका स्पर्धेसाठी)
रु. १५,०००/-, रु. १०,०००/- , रु. ५०००/- व स्मृतीचिन्ह. बालनाट्य स्पर्धेसाठी रु. ७५००/-, रु. ५०००/-, २५००/- देण्यात आली आहेत.

**सभासदांना ओळखपत्र**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या सर्व सभासदांना मध्यवर्ती तर्फे ओळखपत्र दिले जाणार असून ओळखपत्राचे शुल्क मध्यवर्ती ५०% रक्कम व शाखेच्या सभासदांकडून ५०% रक्कम घेण्यात येणार आहे.

**१०० वे नाट्य संमेलन-**

तंजावर येथे नाट्य संहिता पूजन व नटराज पूजन कार्यक्रम ९९ व्या नाट्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. प्रेमानंद गज्वी , तंजावर येथील वंशज शहाजी राजे भोसले, नाट्य परिषदेचे कोषाध्यक्ष श्री. सतीश लोटके, कार्यकारी समिती सदस्य श्री. गिरीश महाजन, नियामक मंडळ सदस्य श्री. आनंद कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी तामिळनाडू प्रांतातील कलावंतांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले.

यानंतर नाट्य संमेलनाच्या सोहळयात 'मुहूर्तमेढ' कार्यक्रम सांगली येथे दिनांक २९ डिसेंबर २०२३ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमास राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री मा.ना. श्री. सुधीर मुनगंटीवार व नाट्य परिषदेचे पदाधिकारी व नियामक मंडळ सदस्य व शाखांचे पदाधिकारी व रसिक प्रेक्षक उपस्थित होते.

शतक महोत्सवी नाट्य संमेलनाचा 'शुभारंभ सोहळा' दिनांक ५ जानेवारी २०२४ रोजी पुणे येथे झाला. पुणे शाखेने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. याप्रसंगी नाट्य परिषदेचे सर्व विश्वस्त मंडळ कार्यकारी समिती, नियामक मंडळ व शाखांचे पदाधिकारी उपस्थित होते.

तसेच दिनांक ६ आणि ७ जानेवारी २०२४ रोजी १०० व्या नाट्य संमेलनाचा 'उदघाटन सोहळा' पिंपरी-चिंचवड येथे संपन्न झाला. याचे आयोजन पिंपरी चिंचवड शाखेने केले.

शतक महोत्सवी नाट्य संमेलनानिमित्त विभागीय नाट्य संमेलने खालील कालावधीत विविध ठिकाणी संपन्न झाली.

सोलापूर – दिनांक २७ , २८ जानेवारी २०२४
बीड – दिनांक २ फेब्रुवारी २०२४
लातूर – दिनांक १३, १४ फेब्रुवारी २०२४
महाबळेश्वर – दिनांक २३ ते २५ फेब्रुवारी २०२४

अहमदनगर, नागपूर आणि मुंबईतील विभागीय नाट्य संमेलने पुढील वर्षी करण्याचे आयोजिले आहे. त्यानंतर शतक महोत्सवी नाट्य संमेलनाचा समारोप रत्नागिरी येथे संपन्न होणार आहे.

# आभार

१. मा.ना. श्री. एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.
२. मा.ना. श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.
३. मा.खा. श्री. शरद पवार, माजी केंद्रीय कृषीमंत्री, भारत सरकार.
४. मा.ना. श्री. सुधीर मुनगंटीवार, सांस्कृतिक कार्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.
५. मा.ना. श्री. उदय सामंत, उद्योगमंत्री, महाराष्ट्र राज्य
६. मा.श्री. उद्धवजी ठाकरे, माजी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.
७. मा.आ.श्री. अजितदादा पवार, माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.
८. मा.श्री. शशी प्रभू, वास्तू विशारद.
९. मा खरगे. सचिव, सांस्कृतिक कार्य.
१०. मा. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन.
११. मा.श्री. रवी सावंत, सनदी लेखापाल
१२. कायदेशीर सल्लागार, ॲड. घनश्याम हुले.
१२. मा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका
१३. महाराष्ट्रातील सर्व वृत्तपत्रे त्यांचे संपादक व वार्ताहर.
१४. आकाशवाणी व विविध वाहिन्यांचे संचालक, महाराष्ट्रातील सर्व नाटयगृहे, त्यांचे संचालक मंडळ व व्यवस्थापक.
१५. परिषदेच्या सर्व शाखा व त्यांचे सभासद.
१६. परिषदेच्या सर्व उपक्रमात भाग घेणारे सर्व रंगकर्मी, घटक संस्था, हितचिंतक, आश्रयदाते, कर्मचारी वर्ग आणि मायबाप रसिक प्रेक्षक.